# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 13/04/2018 रोजी (का.प.क्र.25) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

शुक्रवार दि.13/04/2018 रोजी (का.प.क्र.25) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11:45 वा. वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
05. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
06. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
07. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
08. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
09. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
10. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
11. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
12. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.राजगौरव वानखेडे :तीन दिवसापूर्वी जम्मू-काश्मिर येथे अतिरेक्यासोबत झालेल्या चकमकीत औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापुर येथील किरण थोरात हे शहीद झाले.त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

(यास स.श्री.वैद्य, श्री.सुरे,श्रीमती.किर्ती शिंदे यांनी अनुमोदन दिले)

(यावेळी स्व.श्री.किरण थोरात यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली)

श्री.राजगौरव वानखेडे :आम्हाला पाण्याच्या संदर्भात चर्चा करायची आहे.

मा.सभापती :आजच्या सभेला श्री.चहल,श्री.अफसर सिद्दीकी,श्री.कोल्हे उपस्थित राहणार नाही, तशी कल्पना त्यांनी मला दिली.समांतर बाबत मा.कोर्टात आज तारीख आहे. त्यामुळे चहल येथे नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :त्यांना फोन करून बोलवून घ्या. पाण्याचा प्रश्न हा खूप बिकट झाला आहे. आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले की, शहरातील येणारा पाणी पुरवठा हा दुषित होत आहे. पाण्याची तपासणी केली का? काय रिपोर्ट आला रात्री 10.30, 11.00 वाजता असे मॅसेज आले की हडको-सिडको मधील हरी सिध्दी टाकी आणि जेलची टाकी अशा तीन टाक्यामध्ये पाण्याचे सप्लाय हा तीन दिवस आड करण्यात आला. पुर्ण शहरातले पाणी पुरवठा 3 दिवसाआड करणार आहे का?

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डात चार गल्ल्यांमध्ये दूषित पाणी येत आहे. तो प्रश्न सोडवावा. माझा वार्डामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची 100 एकर जागा मोकळी आहे. आजच्या घडीस त्या जागेमध्ये कुठलीही डेव्हलपमेंट नाही. मयुरपार्क पासुन नारेगाव पर्यंत मुख्य मलवाहिनी सप्टेंबर 2015 पर्यंत पूर्ण करण्यात आलेली आहे. आणि सप्टेंबर 2015 मध्ये वार्डामध्ये नाला पुर्णपणे कोरडा पडलेला होता. जनावरावाले असतील त्यांची सर्व जनावरे आपल्या महानगरपालिकेच्या कोडवाडयात नेऊन टाका. मागच्या 10 वर्षापूर्वी आपण त्याच लाईनीवर ऑपरेटिंगमध्ये जवळपास 10 लाखाचा खर्च केलेला आहे. दरवेळेस ते डेव्हलपमेंट करतील आणि चोकअप काढायचे का? लोकांच्या घरात पाणी येते. जेटींग मशीन केव्हा येणार?

श्री. रुपचंद वाघमारे :माझ्या वार्डात एका व्यक्तीचे दिडशे वे दोनशे गायी आहे, ज्यावेळेस ते रस्त्यांनी पळतात त्यावेळेस नागरिकांना मारतात, मी वारंवार आपल्या कोंडवाडयावाल्याला पकडून नेण्याचे सांगितले कार्यवाही होत नाही की, गाडी येते त्यावेळेस ते गायी तिथे नसतात. संध्याकाळी त्या जटवाडा रोडला सहारा हाऊस पासून तर पावर हाऊस पर्यंत हजारो लोक जा ये करतात. भाजीपाला खरेदी करायला लोक येतात, त्यावेळेस त्या गायी पळतात. अपघात होऊ शकतो. दुसरा प्रश्न असा की, त्या जेलच्या आजुबाजुला बांधकाम परमिशन आपण लोकांना देत नाही. माझी एक विनंती राहणार आहे की नगररचना विभागाचे जे-जे अधिकारी असतील त्याचा खुलासा घ्यावा.

मा.सभापती :जे प्रश्न उपस्थित केला त्याबद्दल प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी संबंधीतावर गुन्हे दाखल करावे.

श्री.रुपचंद वाघमारे :जेलच्या बाजुला बांधकाम परवानगी का मिळत नाही.

उपअभियंता(नगररचना):डिपार्टमेंटने एक उच्चस्तरीय समिती गठीत केलेली आहे. जेलच्या आजुबाजुच्या 500 मीटरच्या आत परवानगी देऊ नये कमिटीने निर्णय घेतला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :दिशा कन्स्ट्रक्शनने 500 मी आत बांधकाम केले ते पाडणार आहात का? इतर शहरात हाच नियम लागु आहे का?

श्री रुपचंद वाघमारे :सवेरा पार्कला बांधकाम परवानगी का देत नाही. कमिटीचे अध्यक्ष मा.आयुक्त आहे, योग्य निर्णय घ्यावा मनपाचे उत्पन्न बुडत आहे. इतर शहरात जेलच्या बाजुला 45-50 मजली इमारत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :पुणे,नाशिक,मनपाची माहिती घेतली की? तेथे काय परिस्थिती आहे.100-200 मीटर आपण समजु शकतो पण तुम्ही जर 500 मीटर म्हणत असाल तर मग तुम्ही डेव्हलपमेंट थांबवता आहे. शासनाचा जीआर नाही, मनपा आयुक्त, शहराचे कलेक्टर, सीपी शहरातीलच सर्व अधिका-याची समिती आहे, याचा विचार करावा, असे सांगावे आणि 500 मीटरच्या ऐवजी 200 मीटर 300 मीटर पर्यंत याचा निर्णय घ्यावा.

मा.सभापती :सभागृहाच्या भावना आयुक्तपर्यंत द्याव्यात पुन्हा विचार करावा.

श्रीमती किर्ती शिंदे :महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या रुग्णालयात ज्या मुली जन्माला येते, त्यांच्या नावे 20 हजार रुपये जमा होणार, ही योजना एक वर्ष चालली आणि मग पुढे काय झाले?

मा.उप आयुक्त :ही योजना बंद झाली नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :तरतुद आहे निधी वापरला जात नाही.

आरोग्य अधिकारी :ही योजना महिला बालकल्याण समितीच्या माध्यमातून राबवतो. सध्या ही योजना कार्यरत नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :ही योजना फक्त एकच वर्ष चालली 2014 ते 2015 पर्यंत त्याच्यानंतर त्या मुलीच्या नावे खाते ओपन केले नाही व रक्कम जमा झालेले नाही. बालकल्याण विकास यांनी तरतुद केलेली आहे, पण तो निधी वापरण्यात आलेला नाही.

श्री रेणूकादास वैद्य :ही चांगली योजना आहे. महाराष्ट्र शासन राज्यभर ही योजना राबवते. समिती आली होती त्यांनी नाराजी व्यक्त केली या योजनेचे कामासाठी तरतूद करावी गरीबांना लाभ मिळेल. शासनाच्या धोरणाला वाटा फोडू नये. ही योजना चालू करावी.

मा.सभापती :ही योजना चालू करण्याकरीता कार्यवाही करावी बजेट मध्ये तरतूद करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :महिला स्वच्छतागृह स्वच्छ नसते. तेथे पुरुष ही जातात. सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे. पुरुष जाणार नाही दखल घ्यावी. तसेच पावसाळा जवळ येतो आहे. नाले साफ होत नाही नाल्यातील घाण बाजूला न टाकता तेथून उचलून दुसरीकडे टाकावे.

मा.सभापती :ज्या सूचना मांडल्या त्याची दखल प्रशासनाने घ्यावी. नाला सफाईचे काम तात्काळ सुरु करावे.

| | |
|---|---|
| श्रीमती मनीषा मुंढे | :8 दिवसात नाला भिंतीचे काम करुन देणार होते. कालचे पावसाचे पाणी लोकाच्या घरात गेले. त्वरीत काम करावे. |
| मा.सभापती | :ताबडतोब काम सुरु करावे. |
| श्रीमती राखी देसरडा | :माझ्या वार्डात एलईडीची लाईटची फिटिंग केलेली आहेत, तर आर्धे लाईट बंद आहे. लाईट विभागामध्ये लोक कमी आहे कंत्राटी बेसेसवर काही कर्मचारी नेमलेले आहे, तर ते येत नाही आणि 6 महिन्यापासुन वार्डामध्ये ठेकेदार आलेला नाही. एक काम करण्यासाठी चार जागी मनपाचा पैसा हा वाया जातो आहे. लाईनमन नेमुन लाईटचे काम करुन घ्यावे. |
| शहर अभियंता | :शहरामध्ये विविध ठिकाणी लाईटच्या कामासाठी काही कॉम्प्रेसीव्ह एजन्सीने कॉन्ट्रॅक्टर नेमलेले होते, त्या कॉन्ट्रॅक्टरची मुदत संपलेली होती. काल मा आयुक्तांशी चर्चा केली आहे. आणखी तीन महिन्याची मुदत देणार आहे. |
| श्रीमती किर्ती शिंदे | :मुख्य रस्त्यावर लाईट बंद असतात. |
| श्रीमती संगीता वाघुले | :उद्या आंबेडकर जयंती आहे, तर जे लाईट बंद असतील ते चालु करण्याचे आदेशित करण्यात यावे. |
| श्री.रेणूकादास वैद्य | :6-6महिने ठेकेदार वार्डात येत नाही. बील कसे दिले जाते. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. |
| शहर अभियंता | :या बाबतीत मिटिंग घेतली होती, कॉन्ट्रॅक्टर लोकांची नेमणूक होते आणि कामा करीता काहीच नाही. जेव्हा लाईट बंद असतात, तेव्हा कॉन्ट्रॅक्टरचे लक्ष देत नाही. त्यांचा आम्ही आता सर्व्हे केलेला आहे आणि याच्या बाबतीत नक्कीच आपण त्यांनी काम केले असेल तरच पेमेंट देऊ. |
| श्री रेणूकादास वैद्य | :काल मा.आयुक्त साहेबांना भेटलो विदाऊट टेंडर एक्सटेंशन दिलेलं आहे ही अतिशय चुकीचे आहे. जर आपल्याला काम करायचे आहे, तर टेंडर काढून कार्यवाही का होत नाही. एक महिन्याची मूदतवाढ द्या. टेंडर काढून कार्यवाही करावी. |
| श्री.रेणूकादास वैद्य | :एलईडी लाईट लागले त्याचा अजिबात प्रकाश पडतांना दिसत नाही. असे असेल तर तो ठेकेदारास 100 टक्के सेव्हिंग करेल. |
| शहर अभियंता | :40 हजार दिवे लावणार आहे. त्यात ब्रॅकेट एक्सटेन्शन बॉक्स बदलणार आहे मुख्य रस्ते आधी घेतले. सर्व पाहणी करुनच बील अदा केले जाईल. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :24 मीटरचा रस्ता असेल तर एका साईटला 75 वॅटचा दुसऱ्या साईटला 75 त्यावेळेस ते 150 चा चांगला प्रकाश पडणार आहे. तुम्ही एकाच साईटला 75 चा लावता आहे, तर ते आर्ध्या रस्त्यापर्यंत त्याचा प्रकाश पडतो. 24 मीटर,18मीटर असेल 12 मीटर असेल कोणत्या रोडवर कशा पद्धतीने आपण हे दिवे लावणार आहे, त्याचा प्रजेंटेशन ती माहिती पूर्ण सभागृहात दाखवावे. |
| शहर अभियंता | :तपासून घेतो 90% ठिकाणी व्यवस्थित लाईट लावलेले आहे. ज्या ठिकाणी अशा प्रकारचा प्रॉब्लेम असेल त्या ठिकाणी आपण ते तपासुन घेऊ. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :75 वॅटचे लाईट लावल्यावर दुरवर प्रकाश पडणार आहे की नाही? मध्यभागी लावायला पाहिजे का? किंवा रस्त्याच्या दोन्ही बाजुला 75-75 वॅटचे लाईट लावायला पाहिजे का? याचा विचार कोणी करणार आहे कि नाही, ठेकेदार सांगेल त्याप्रमाणे काम कराल का? |
| मा.सभापती | :या प्रश्नाबद्दल सविस्तर खुलासा शहर अभियंता यानी पुढील बैठकीत दयावा |
| श्री.ऋषीकेश खैरे | :उद्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे, तर रोडच्या साईटला भोईवाडा भागात जो पुतळा आहे, तर तिथे दोनच लाईट लावले आहे, तिथे तीन ते चार गल्ल्या आहेत, तर तिथे अंधार पडलेला आहे लाईट लावावे. |
| मा.सभापती | :ज्या-ज्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा पुतळा आहे त्या ठिकाणी लाईट नाही, त्या-त्या ठिकाणी लाईट लावण्याची दखल घ्यावी |
| मा.सभापती | :आजच्या आज लाईट लावण्यात यावे. |

श्री.देशमुख(उपअभियंता) :आजच लाईटची व्यवस्था करतो आहे.

श्री. सय्यद मतीन :रमजान या पवित्र महिना लागण्यापूर्वी शहरात तसेच कब्रस्तानमध्ये लाईटची सुविधा करुन द्यावी.

मा.सभापती :शहरात लाईट लागेल याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री. सय्यद मतीन :स्मशानभुमी, कब्रस्तानमध्ये जे लोक काम करतात, स्मशानभुमीमध्ये काम करणारे लोकाच्या मागणीचे निवेदन स्विकारावे.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेला 20/05/2017 रोजी ठराव क्रमांक-1,011 मान्यता आहे, त्यानुसार या लोकांचा प्रशासनाने विचार करावा त्याना न्याय द्यावा.

श्री.रेणूकादास वैद्य :हे मंजुरी देण्यात आलेली आहे, या लोकांना फिक्स वेतनावर ठेवण्यात यावे. ठराविक हे लोक अतिशय मेहनत करतात, आणि त्यांच्या कुटुबांना या शिवाय दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अशा परिस्थितीमध्ये 20/05/2017 ला ठराव झालेला आहे, त्याबद्दल आतापर्यंत कारवाई केलेली नाही. त्या नंतर 2 एप्रिल रोजी मा.महापौर घोडेले साहेब यांनी सुध्दा मा.आयुक्त साहेबांना कार्यवाही करणे बाबत लेखी पत्र दिलेले आहे. या लोकांना न्याय देण्यापासुन टाळाटाळ का होत आहे.

उपआयुक्त (महसुल) :ठराव मंजूर आहे. पॉझेटिव्ह कसे करता येईल ते बघतो कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :तातडीने कार्यवाही करावी पुढील सभेत अहवाल सादर करावा.

श्री.ऋषीकेश खैरे :समर्थनगरमध्ये स्मशानभुमी आहे तिथे अंत्यसंस्कार होतात, ती गार्डन साठीची खुली जागा आहे. त्या गोष्टीबद्दल आयुक्तांना पत्र पण दिलेले आहे, आणि 1970 चा डी.पी प्लॅन आहे. त्यामध्ये ही जागा गार्डनसाठी आहे. तेथे साफसफाई करायला लावतात, जे.सी.बी पाठवतात. जेव्हा नागरिकांचा विरोध होतो आहे, तेव्हा तुम्ही त्यांच्यावरती मनमानी करतात. त्या नागरिकांना अरे-तुरे बोलतात हे योग्य नाही.

मा.सभापती :संबंधीत अधिकारी श्री.अभंग येथे नाही.

श्री.रेणूकादास वैद्य :माझ्या वार्डात हातगाडया हटवण्या बाबत सांगितले श्री अभंग कार्यवाही करीत नाही त्यांचा चार्ज काढावा.

श्रीमती स्वाती नागरे :माझ्या वार्डात एन-11 स्मशानभुमी जवळ रस्त्यावर वाळू, खडीचे ट्रॅक्टर उभे असतात त्यांचावर कार्यवाही का होत नाही.

मा.सभापती :स.सदस्यानी केलेल्या सुचनांची दखल घेऊन कार्यवाही करावी. गार्डनच्या जागेवर अंत्यविधी होऊ नये. सलीम अली सरोवर परिसरात होत असलेले अतिक्रमण काढावे.

श्री.सय्यद मतीन :शहरातील होर्डींग बाबत सर्व्हे करावा सदस्यांना सोबत घ्यावे असे आदेश केले होते. अद्याप सर्व्हे केला नाही. कॉलेज परिसरात शैक्षणिक दृष्टया पोस्टर असावे

मा.सभापती :स.सदस्य श्री.सय्यद मतीन यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे,त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

मालमत्ता अधिकारी :लिगल होर्डिंग्ज माहिती देण्यात आलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :अनधिकृत होर्डिग्ज किती आहे यादी देणार होते दिली नाही.
किती इलीगल होर्डिग आहे प्रशासंनाकडे सर्व्हेसाठी वेळ नाही. तर आम्ही सर्वे करून द्यावा का?

मालमत्ता अधिकारी :होर्डिग्ज सर्वे केला,शहरात 19 प्रकाराच्या होर्डिग्ज आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :जालना रोड ते चिखलठाणा इतपर्यंत 25 होर्डिंग आहेत. पूर्ण शहरात किती होर्डिग्ज आहेत. इलिगल किती? ज्यांना परवानगी दिली. त्यावर नंबरीग नाही. नंबर का टाकले नाही.

मा.सभापती :पुढच्या मिटिंगपर्यंत याची सविस्तर माहिती द्यावी.

श्री.मतीन सय्यद :हेरीटेज वास्तू सूरक्षिततेच्या दृष्टीने मनपा कमेटी केली त्यांनी काय काम केले. नहर-ए-अंबरी मोडकळीस आलेली आहे दखल घ्यावी.

मा.सभापती :हेरिटेज वास्तू बाबत प्रशासनाने दखल घ्यावी

श्री.मतीन सय्यद :नहर-ए-अंबरी पाणी पिण्या योग्य आहे वापरण्यात यावे. मनपाचा इतर पाणीपुरवठ्याचा खर्च वाचेल.

मा.सभापती :श्री.सय्यद मतीन यांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला याची दखल प्रशासनाने घ्यावी. नहर-ए-अंबरी कामासाठी बजेट मध्ये तरतुद करावी.

**विषय क्र. 365 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दि.30/11/2016 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.796 नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्राणि संग्रहालयासाठी डॉ.इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन, पशुवैद्यक (Zoo Veterinarian /Wild Life Expert) यांना दि.14/10/2016 पासून पुढील 06 महिन्यांकरीता प्रतिमाह रू.25,000/- मानधनावर नियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदरची मुदतवाढ दि.13/04/2017 रोजी संपल्याने तसेच त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देण्यास हरकत नाही, असे उद्यान अधिक्षक तथा संचालक, प्राणी संग्रहालय यांनी कळविले आहे. त्यानुषंगाने डॉ.इनामदार यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.14/04/2017 पासून 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर केलेला प्रस्ताव मान्यतेच्या अधिन राहून दि.06/10/2017 रोजीच्या आदेशान्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दि.15/11/2017 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्र.05 मध्ये संबंधीतास दि.14/04/2017 पासून 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याबाबत ठराव पारीत झाला.

उक्त मुदतवाढ दि.13/10/2017 रोजी संपल्याने तसेच त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत संचालक, प्राणी संग्रहालय यांनी कळविले आहे. त्यानुषंगाने डॉ.इनामदार यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.16/10/2017 पासून 06 महिन्यांसाठी प्रतिमाह रू.25,000/- मानधनावर नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.रेणूकादास वैद्य :दिनांक 14/4/2017 पासून पूढे सहा महिने मुदत मागता त्याला वर्ष होत आहे. उशीर का झाला.

पशुसंवर्धन अधिकारी :प्रस्ताव वेळेवर दिला आस्थापनाकडे संचिका होती.

श्री.रेणूकादास वैद्य :दिनांक 14/04/2018 याला पुर्ण एक वर्ष होत आहे, आणि तुम्ही सहा महिन्याची मुदत वाढ मागता आहे.राहिलेल्या सहा महिन्याचे काय, याचा पिरेड संपलेला आहे, आम्ही याला का मंजुरी द्यायची? विनंती आहे की या लोकांना कंत्राट बेसवर घ्या. दर दोन महिन्याला तीन महिन्याला त्यांच्या पेमेंट होतात प्रशासनासमोर कशासाठी आणले वर्ष झाल्यावर आणि आम्ही सहा महिन्याची मंजुरी द्यायची. म्हणजे उद्या याची तारीख संपली तर उद्याच्या स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव तुम्हाला परत आणावे लागेल.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार संबंधीतास प्रशासनाने यापुढील मुदतवाढ ही आऊट सोर्सीगद्वारे द्यावी, जेणेकरून संबंधीताच्या मुदतवाढीस वेळ लागणार नाही. विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्राणि संग्रहालयासाठी डॉ.इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन, पशुवैद्यक (Zoo Veterinarian /Wild Life Expert) यांची मुदतवाढ दि.13/10/2017 रोजी संपल्याने तसेच त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत संचालक, प्राणी संग्रहालय यांनी कळविल्यानुसार डॉ.इनामदार यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.16/10/2017 पासून 06 महिन्यांसाठी प्रतिमाह रू.25,000/- मानधनावर नियुक्तीस मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीताची यापूढील नियुक्ती ही प्रशासनाने आऊट सोर्सीगद्वारे करण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 366 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हिलाल कॉलनी खाम नदीत (नाला) संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,99,815/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील नाला ट्रेनिंग कामे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.49,99,815/- चे सुधारीत अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्र.366 ते 371 मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिलाल कॉलनी खाम नदीत (नाला) संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,99,815/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 367 :**

विषय : वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर A अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे.

या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,93,838.27/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र./Tender ID-2018-AMCA-287696-4

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर A अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक 07/02/2018 विषय क्र.283 र.रू.49,98,840/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.49,98,837/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.दिव्य मराठी दि.03/03/18<br>दै.पुण्य नगरी दि.03/03/18<br>दै.शासन सम्राट दि.03/03/18 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 19 मार्च 2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 27 मार्च 2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन (03) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त** |
|---|---|---|---|
| 1 | श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन | र.रू.49,93,838.27/- | अं.प. दरापेक्षा 0.10% कमी दराने |
| 2 | मे.एम.ए.सईद | र.रू.52,38,781.28/- | अं.प. दरापेक्षा 4.80% जास्त दराने |
| 3 | मे.सफल कन्स्ट्रक्शन | र.रू.53,28,760.35/- | अं.प. दरापेक्षा 6.60% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे. |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,93,838.27/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर A अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,93,838.27/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 368 :**

विषय : वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर A अंतर्गत सेंट झेव्हीयर्स समोरील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे.

या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,20,294.01/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र./Tender ID-2018-AMCA-287696-2

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर A अंतर्गत सेंट झेव्हीयर्स समोरील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक 07/02/2018 विषय क्र.284 र.रू.48,56,167/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.46,24,918/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.दिव्य मराठी दि.03/03/18<br>दै.पुण्य नगरी दि.03/03/18<br>दै.शासन सम्राट दि.03/03/18 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 19 मार्च 2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 27 मार्च 2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन (03) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन | र.रू.46,20,294.01/- | अं.प. दरापेक्षा 0.10% कमी दराने |
| 2 | मे.एम.ए.सईद | र.रू.48,19,195.52/- | अं.प. दरापेक्षा 4.20% जास्त दराने |
| 3 | मे.सफल कन्स्ट्रक्शन | र.रू.49,39,413.41/- | अं.प. दरापेक्षा 6.80% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे. |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,20,294.01/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर A अंतर्गत सेंट झेव्हीयर्स समोरील रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,20,294.01/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 369 :**

विषय :वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर E South येथील अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे,या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.26,39,273.93/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र./Tender ID-2018-AMCA-287696-3

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर E Southयेथील अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्सकॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक 07/02/2018 विषय क्र.282 र.रू.26,41,918/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.26,41,915/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.दिव्य मराठी दि.03/03/18<br>दै.पुण्य नगरी दि.03/03/18<br>दै.शासन सम्राट दि.03/03/18 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 19 मार्च 2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 27 मार्च 2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन (03) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन | र.रू.26,39,273.93/- | अं.प. दरापेक्षा 0.10% कमी दराने |
| 2 | मे.एम.ए.सईद | र.रू.27,58,160.15/- | अं.प. दरापेक्षा 4.40% जास्त दराने |
| 3 | मे.सफल कन्स्ट्रक्शन | र.रू.27,89,863.14/- | अं.प. दरापेक्षा 5.60% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे. |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.26,39,273.93/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर E South येथील अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.26,39,273.93/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 370 :</u>**

विषय : वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर B अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे.

या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,91,783.15/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र./Tender ID-2018-AMCA-1287696-1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर B अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक 07/02/2018 विषय क्र.285 र.रू.49,96,780/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.49,96,779/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.दिव्य मराठी दि.03/03/18, दै.पुण्य नगरी दि.03/03/18, दै.शासन सम्राट दि.03/03/18 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 19/03/2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 27/03/2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन निविदा |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन | र.रू.49,91,783.15/- | अं.प. दरापेक्षा 0.10% कमी दराने |
| 2 | मे.एम.ए.सईद | र.रू.52,01,647.91/- | अं.प. दरापेक्षा 4.10% जास्त दराने |
| 3 | मे.सफल कन्स्ट्रक्शन | र.रू.53,41,557.75/- | अं.प. दरापेक्षा 6.90% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे. |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,91,783.15/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.38 MIDC चिकलठाणा, सिडको एन-1 सेक्टर B अंतर्गत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक या कामाचे ठेकेदार श्री.जहागीरदार सबाहऊद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू. 49,91,783.15/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 371 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने औरंगाबाद येथे स्मृतिवन व स्मारक उभारणेच्या कामाकरीता PMC नियुक्त करणेसाठी ई-महा-निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | प्रकल्पाची टक्केवारी शुल्क |
|---|---|---|
| 1 | M/s. ROARK CONSULTING | 3.95% Project Cost |
| 2 | M/s. ARC ASSOCIATES | 2.70% + GST Extra |
| 3 | M/s. ARCHOHM CONSULTS PVT. LTD. | 3.50% |

उक्त प्राप्त दरपत्रकांपैकी सर्वात कमी दर हे M/s. ARC ASSOCIATES यांचे आहेत. निविदानुसार दर हे सर्व करासह विचारात घेणे अशी तरतुद असल्याने त्यांनी दिलेले दर हे 2.70% हे विचारात घेतले किंवा 2.70% + GST Extra चे विचारात घेतले (सद्याचा GST दर 18% विचारात घेता) तर 2.70+0.49=3.19% एवढे होत आहे.

करीता सदर कामासाठीचे प्राप्त सर्वात कमी दराचे M/s. ARC ASSOCIATES यांचे प्रकल्प किमंतीच्या 3.19% टक्केवारी शुल्काच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत शिफारस करण्यात येत आहे.

करिता उक्त नमुदनुसार सदर प्रकल्पासाठी PMC नियुक्त करावयाच्या M/s. ARC ASSOCIATES यांचा प्रकल्प किमंतीच्या 3.19% दराचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने औरंगाबाद येथे स्मृतिवन व स्मारक उभारणेच्या कामाकरीता PMC नियुक्त करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक M/s. ARC ASSOCIATES यांचेकडून प्रकल्प किमंतीच्या 3.19% दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री रेणूकादास वैद्य :घाटी हॉस्पिटल आहे, तर त्या ठिकाणी एक मेडिकल स्टोर आहे, तर ते एका अपंग व्यक्तीला देण्यात आले होते. पण काही दिवसांनी त्या अपंग व्यक्तीचा मृत्यु झाला त्यानंतर अनेक लोकांनी त्या मेडिकलसाठी शॉपची मागणी केली. त्या अपंग व्यक्तीच्या वारसांना देण्याचे ठरवले कार्यवाही का केली नाही.

मा.सभापती :सुचना विचारात घ्यावी कार्यवाही करावी

श्री. रेणूकादास वैद्य :दोन वर्षापासुन त्या जागेवरचा येणारा उत्पन्न हा मनपाचा बुडला आणि दुसरी गोष्ट अनेक अपंग व्यक्तींनी मागणी केली दोन वर्षापासुन मालमत्ता विभागास काय अडचण आहे. स्थायी समितीमध्ये अद्याप त्याचा प्रस्ताव नाही.

मालमत्ता अधिकारी :अपंगासाठी तो गाळा आहे कूणास दयायचा धोरण ठरवावे लागेल. संचिका कार्यवाही अंतर्गत आहे.

मा.सभापती : सौ.गौरी सुभाष कदम, श्री स्वामी समर्थ एंटरप्राईजेस यांनी संत गाडगे बाबा समिती मधील गाळा क्रमांक 03 व 20 हे गाळे भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे, त्यास मंजुरी देण्यांत येते, प्रशासनाने नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच श्रीमती सुनिता दामोधर माहोरे या आर.सी.एच.-2 अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर कम लिपीक या पदावर पूर्वी करारतत्वावर कार्यरत होत्या. त्यांनी पुढील नियुक्तीसाठी विनंती अर्ज सादर केला आहे. मा.सर्वसाधारण सभा दि.09/05/2012 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठराव क्र.757 नुसार संबंधीतास मंजुरी देण्यात आलेली आहे.

आर.सी.एच. अंतर्गत कार्यरत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणेच आरसीएच-2 अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर कम लिपीक या पदावर पुनश्चः करार तत्वावर नियुक्ती देण्यांस मान्यता देण्यात येते. तसेच संबंधीतास एनयुएचएम अंतर्गत कार्यरत इतर डाटा एन्ट्री ऑपरेटर कम लिपीक यांच्या प्रमाणेच वेतन अदा करण्यात यावे, आस्थापना विभागामार्फत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद